

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार


**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine November 2016 - Pages - 28**

संपादक : श्री. रामचंद्र लक्ष्मण शेटे    कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

* पुणे * वर्ष ६८ वे * अंक १ * **नोव्हेंबर २०१६** * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या ६६ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी व्याख्याते दै. सकाळ पुणेचे संपादक मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले आणि कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

# ❊ कुलगुरु कै. वि. ग. तथा दादासाहेब केतकर ६६ वा स्मृतिदिन क्षणचित्रे ❊




कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना व्याख्याते दै. सकाळ पुणेचे संपादक मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले, समवेत कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, पाठीमागे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, समवेत डावीकडून कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, प्रमुख पाहुणे मा. श्री. मल्हार अरणकल्ले कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे




व्याख्याते मा. श्री. मल्हार अरणकल्ले यांचा परिचय करुन देताना कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, व्यासपिठावर उपस्थित डावीकडून कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, श्री. मल्हार अरणकल्ले, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे





'कुलगुरू कै. दादासाहेब केतकर गुणवंत विद्यार्थी पुरस्कार' श्री. मल्हार अरणकल्ले यांचे हस्ते स्वीकारता विद्यार्थी चि. हर्षद गाडे आणि चि. अजय वाघ

**संपादकीय**

# आयुष्याची फलश्रुती


आत्मविश्वास हा खरा आपल्या प्रगतीचा मूळ पाया आहे. आत्मविश्वासाच्या जोरावरच खरेतर आपण कोणत्याही क्षेत्रात चिकाटीने व ध्येयाने कार्य करु शकतो व आपण आपल्यासाठी निवडलेल्या क्षेत्रात मनापासुन खरे यश व सन्मान मिळवू शकतो.

जगात यश व सन्मान मिळवण्यासाठी व ते सिद्ध करण्यासाठी प्रत्येकाला स्पर्धेत उतरावयाला लागते व यातुनच जीवनामधे एक संघर्ष सुरु होतो. या प्रसंगी अपयश आले तरी ते स्विकारताना मन प्रसन्न व शोधक हवे या साठी मात्र आपली विचारसरणी ही उच्च असावयाला हवी. तसेच सल्लागार व मित्र यांची निवडही अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी कधीही दुष्ट चालीरीतीचे आचरण करु नये. माणसाचे मोठेपण हे त्यांच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. जन्मावर नव्हे. आपल्या प्रयत्नावर आपली श्रद्धा असणे हे प्रगतीचे खरे मूळ आहे.

जीवनात आचार, विचार व उच्चार यांची एकता असावयास हवी. ज्ञानी माणसांकडून ज्ञान मिळवा व ते इतरांनाही द्या. तुम्ही जीवनात इतरांच्या मदतीने मोठे होताना तुमचीही मदत इतरांना कशाप्रकारे करु शकेल यासाठी नेहमी प्रयत्नशील रहा. आयुष्यात आपण ज्या प्रसंगातून, परिस्थिती मधुन आलो आहोत याचा कधीही विसर पडू देवू नका. कारण जीवनामधे सद्‌गुण,उदात्त विचार, नम्रपणा, मनाचा मोठेपणा, प्रामाणिकपणा, सत्य हीच खरी विचारांची पुंजी आहे.


कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना जसजशी प्रगती सुरु होते तसा छुपा विरोधही वाढू लागतो, प्रगती सलते, कारस्थानांच्या बिया पेरल्या जातात. तुमच्यावर आरोप करण्याची संधीही शोधली जाते. परंतु या सर्व प्रवृत्तीची सल ही सकारात्मक व पुढील वाटचालीस मार्गदर्शक म्हणून स्विकारल्यास आपल्या प्रगतीचा वेग वाढण्यास पूरक आहे असे वाटते कारण आयुष्यात वेळ व अनुभव हा खरा व्यवस्थापन व कारभाराचा गुरू आहे. आपण स्विकारलेल्या कामावर निष्ठा ठेवली की आपण करीत असलेल्या कार्यात आपोआप यशस्वी होतो.

आत्मविश्वास हाच खरा तुमचा मित्र आहे. त्याच्या जोरावर आपण आपल्या दीर्घ आयुष्याच्या शेवटी आत्मविश्वासाने केलेल्या कार्याने उपयुक्त जीवनाचे समाधान वाटावे ही खरी आयुष्याची फलश्रुती आहे.



**भाऊबीज**
**१ नोव्हेंबर २०१६**

# कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांचा ६६ वा स्मृतिदिन संपन्न



कुलगुरू दादासाहेब केतकर

शुक्रवार दि. २१ ऑक्टोबर २०१६ रोजी कै. ग. वि. तथा दादासाहेब केतकर यांच्या ६६ व्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेच्या अभियांत्रिकी कॉलेजच्या सुसज्ज हॉल मध्ये व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. दैनिक सकाळ, पुणेचे संपादक व संस्थेचे माजी विद्यार्थी मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले यांनी ''**वृत्तपत्रांची सामाजिक बांधीलकी**'' या विषयावर पुष्प गुंफले.

सर्वप्रथम सौ. सायली बापट यांनी ईशस्तवन केले. पाहुण्यांचे शुभहस्ते कै. दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ज्येष्ठ संचालक, माजी कार्याध्यक्ष प्राचार्य हणमंत भोसले यांनी केले. प्रास्ताविकामध्ये प्राचार्य हणमंत भोसले यांनी संस्थेचा उगम, संस्थेचा उद्देश, त्यासाठी समाजातून झालेले प्रयत्न, तसेच कै. दादासाहेब केतकर यांचा संस्थावाढीमध्ये असलेला महत्त्वाचा व आरंभिचा कष्टप्रद भाग, कै. दादांची निस्पृहवृत्ती व बाणेदारपणा इत्यादी गोष्टींचा उल्लेख केला.

व्याख्यात्यांचा परिचय कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर यांनी करुन दिला. त्यामध्ये श्री. मल्हार अरणकल्ले यांचे सकाळ वृत्तपत्रातील योगदानाचा व कार्याचा उल्लेख केला. कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांचे हस्ते श्री. मल्हार अरणकल्ले यांचे, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

श्री. मल्हार अरणकल्ले यांचे हस्ते महाराष्ट्र विद्यालयातील १० वी व १२ वी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा 'कुलगुरु दादासाो केतकर गुणवंत विद्यार्थी पुरस्कार' देण्यात आला.

आपल्या व्याख्यानात श्री. मल्हार अरणकल्ले यांनी विषयाला अनुसरुन १ तास १० मि. श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संस्कार विरळ / पातळ होत नाहीत. संस्कार वाया जात नाहीत. यावर स्वानुभवाची व इतर उदाहरणे दिली. सकाळचे संस्थापक कै. नानासाहेब परुळेकर यांच्या जीवनवृत्ताला स्पर्श करुन दैनिका व्यतिरिक्त त्यांनी समाजाभिमुख केलेली कार्ये याची माहिती सांगितली. मुख्यतः 'अनाथ विद्यार्थी गृह' मधील 'अनाथ' शब्द दूर करुन 'पुणे विद्यार्थी गृह' हे नामकरण करण्यात पुढाकार घेऊन १९६९ साली त्यांचेच हस्ते ते घडवून आणले. कै. अण्णासाहेब खैर व कै. ना. भि. परुळेकर यांच्या मैत्रीमुळे सकाळ व पुणे विद्यार्थी गृहाचे संबंध आजपर्यंत टिकून आहेत हे आवर्जून सांगितले. वृत्तपत्र हे समाजातील घटनांचे प्रतिबिंब असते. बातम्याव्यतिरिक्तही इतर समाजउपयोगी कामे वर्तमानपत्रे करु शकतात व त्यांनी ती आवर्जून करावीत. काहीजण वर्तमानपत्रांनी इतर कार्य करण्याबद्दल आक्षेप घेतात ते बरोबर नाही. कै. नानासाहेब परुळेकरांनी दै. सकाळ माध्यमातून अशी समाजउपयोगी कामे करण्याची मुहूर्तमेढ पूर्वीच रोवलेली आहे. त्याचा वसा आजही सुरु आहे. विद्यार्थ्यांना परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी मदत करण्यासाठी स्थापन केलेल्या सकाळ फाऊंडेशन मार्फत आज दरवर्षी १५० विद्यार्थी परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदतीचा लाभ घेतात. कुपोशितांसाठी केलेले प्रयत्न, दुधासाठी गायीखरेदी करुन पांजारपोळ संस्थेमार्फत ४० सेंटर चालविली. कारगील युध्दवीरांच्या कन्यांसाठी निधी गोळा करुन ५ अद्ययावत वसतिगृहे सुरु केली आहेत. महिलांसाठी 'तनिष्का' चळवळ सुरु केली. त्यांचे मार्फत पाण्याचे स्रोत निर्माण केले. किर्तनसभेची निर्मिती, इ. दै. साकळच्या विविध कार्याची माहिती दिली. समाज संघटन वृत्तपत्रामार्फत करता येते, मोठे कार्य संघटनेमधून निर्माण करता येते. समाजाच्या उध्दारासाठी, चांगल्या कामासाठी वृत्तपत्रांनी काम केले

पाहिजे. संस्थांना मदत करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यासाठी वृत्तपत्रांनी माध्यम होणे गैर नाही. मदतीची हाक दिल्यावर विश्वासू वृत्तपत्रांना समाज आजही मदत देतो यातच त्यांचे कार्याची पावती आहे. शेवटी भाजलेल्या मृतप्राय मुलींची ह्रदयद्रावक घटना सांगून श्रोत्यांना हेलावून सोडले. सकाळ समूहाने मदत केल्यामुळे हीच मुलगी आज कलेक्टर झालेली आहे.

कै. दादांचे नातू रिटा. ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर यांनी कॉलेज शिष्यवृत्ती देण्यासाठी दिलेल्या मदतीबद्दल श्री. मल्हार अरणकल्ले यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन, ईशस्तवन व  पसायदान गायिका सौ. सायली बापट यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

आभार प्रदर्शनाचे काम संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी केले. ***

# वासुदेव गोपाळ कोकजे सदाचार वसतिगृह, पुणे

**संचालक : श्री. रमेश कुलकर्णी**

सन २०१६-१७ मध्ये वासुदेव गोपाळ कोकजे, सदाचार वसतिगृहात एकूण ९० कॉलेजच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. हे सर्व विद्यार्थी ११वी, १२वी, इंजिनिअरींगचे शिक्षण घेणारे व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग, केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा या परिक्षांचा अभ्यास करणारे आहेत. या विद्यार्थ्यांची जिल्हावार व जातवार संख्या पुढीलप्रमाणे -

**जिल्हावार विद्यार्थी संख्या**

| जिल्हा | वि. सं. | जिल्हा | वि. सं. |
|---|---|---|---|
| अहमदनगर | १२ | उस्मानाबाद | १० |
| पुणे | १४ | रत्नागिरी | ०२ |
| सोलापूर | ०६ | सांगली | ०४ |
| सातारा | ०५ | कोल्हापूर | ०५ |
| नाशिक | ०७ | परभणी | ०२ |
| धुळे | ०३ | बीड | ०५ |
| रायगड | ०१ | नंदुरबार | ०१ |
| मुंबई | ०२ | बुलढाणा | ०१ |
| नांदेड | ०३ | भंडारा | ०१ |
| लातूर | ०२ | औरंगाबाद | ०३ |
| पालघर | ०१ | | |
| | | एकूण | ९० |

**जातवार विद्यार्थी संख्या**

| जात | वि. सं. | जात | वि. सं. |
|---|---|---|---|
| मराठा | ४४ | मांग | ०३ |
| कुणबी | ०४ | महार | १४ |
| कोष्टी | ०१ | चांभार | ०२ |
| ब्राह्मण | ०६ | भानुशाली | ०१ |
| सोनार | ०१ | दुसाड | ०१ |
| लिंगायत | ०१ | महादेव कोळी | ०१ |
| मारवाडी | ०१ | धनगर | ०३ |
| वंजारी | ०३ | माळी | ०४ |
| | | एकूण | ९० |

***

## कॅलेंडर संबंधी निवेदन

**संस्थेचे देणगीदार हितचिंतक आश्रयदाते व माजी विद्यार्थी यांचेकडून संस्थेच्या प्रगतीसाठी मोठ्या प्रमाणावर देणग्या जमा होतात. सदर देणग्यांची प्रसिध्दी संस्थेच्या मासिक समाचार मध्ये दर महिन्याला देण्यात येते. यापुढे सन २०१५-१६ पासून देणग्यांची प्रसिध्दी फक्त समाचार मध्ये देण्यात येईल. पुढील वर्षापासून कॅलेंडरचे स्वरूप बदलत आहोत. कृपया सहकार्य करावे ही विनंती.** ***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

### व्यवसाय मार्गदर्शन

डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी तर्फे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन अशा मार्गदर्शनपर व्याख्यानाची आवश्यकता सांगितली. व्याख्याते श्री. सुहास जाधव यांनी विविध व्यवसाय व अभ्यासक्रमाची माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी पीपीटी शो चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### शिक्षकांचे भूमिकेत विद्यार्थी

शनिवार दि. ३.९.२०१६ रोजी विद्यालयामध्ये शिक्षकदिन विद्यार्थी समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेमधील विद्यार्थी शिक्षकांनी वेळापत्रकानुसार तासिकांचे नियोजन करुन वर्गवार अध्यापनाचा अनुभव घेतला. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांना चांगले सहकार्य केले. प्रथम चार तासिकांचे कामकाज विद्यार्थी शिक्षकांनी पाहिले. प्राचार्य व पर्यवेक्षक यांची भूमिका अनुक्रमे विद्यार्थी चि. हर्षद गाडे इ. १० वी अ आणि चि. अभिषेक माने इ. १० वी ब यांनी उत्तमरित्या पार पाडली. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांचे अध्यक्षतेखाली या विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. विद्यार्थी चि. अभिषेक माने व चि. हर्षद गाडे यांनी आपले अनुभव कथन करुन शिक्षक आम्हाला किती चांगले मार्गदर्शन करुन अभ्यासाची आवड निर्माण करतात, वर्गातील शिस्त किती महत्त्वाची आहे हे आम्ही शिक्षक म्हणून वावरताना जाणवले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वर्ग व शालेय परिसरात शिस्त बाळगण्याचे आवाहन केले.

### राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री संयुक्त जयंती उपक्रमांतून साजरी

दि. २ ऑक्टोबर २०१६ रोजी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांच्या हस्ते करण्यात आले. 'शिक्षणाबाबतच महात्मा गांधी यांचे विचार' याबाबत विद्यार्थी चि. प्रशांत खोसे याने माहिती दिली. दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्याबाबत उपशिक्षक श्री. विष्णूदास गावडे यांनी माहिती दिली. वर्गावर्गातून या महापुरुषांच्या जीवनकार्यास अनुसरुन विविध विषयांवर विद्यार्थी सहभागाने स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

### आर्थिक बचत या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी भविष्यात 'आर्थिक बचत' या विषयावर बॉम्बे स्टॉक एक्सचेंज व अमृतवेल यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. धर्मेंद्र पवार व श्री. विलास पाटील यांनी सखोल माहिती दिली. शेअर मार्केट व इतर गुंतवणूकीचे मार्ग, तसेच दैनंदिन जीवनात उधळपट्टी ऐवजी गरजा कमी करुन आर्थिक बचत करता येते, याची विद्यार्थी जीवनातील अनेक उदाहरणे देऊन माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी वक्त्यांचा सत्कार केला. प्राध्यापिका राजश्री कसबे यांनी सूत्रसंचालन केले.

### 'वाहतूक जनजागृती दिन' विद्यालयाचा सहभाग

दि. ६.१०.२०१६ रोजी पुणे शहर वाहतुक विभाग आयुक्तांच्या आदेशानुसार, सर्वसामान्य लोकांना वाहतुकीचे नियम कळावेत. त्यांनी व सर्वांनीच किमान पाच नियम पाळले तर वाहतूक रहदारी सुरळीत होईल, या हेतूने पुण्याच्या रस्त्यांवरून मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यालयातील चारशे विद्यार्थ्यांना शाखेतर्फे सर्वांना, नियम पाळण्याचे आवाहन स्वरुप शपथ पोलिसांनी दिली. सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांच्यासह,

श्री. रमेश चौधरी, श्रीमती कीर्ती राठोड, श्रीमती रुपाली शिंदे, श्री. मल्लीनाथ वाघमोडे, श्री. अविनाश लाड, श्री. देविदास काळे, श्री. धनश्री कुलकर्णी, श्रीमती बोंबलट, सौ. अर्चना भाट आदी सहभागी झाले होते.

**विद्यार्थिनींसाठी आरोग्य प्रबोधनपर व्याख्यान**

इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थिनींसाठी जनआधार या स्वयंसेवी संस्थेतर्फे, मनपा, पुणे आरोग्य खात्याच्या सहकार्याने वयात येतानाचे आरोग्य स्वच्छता व त्याबाबत घ्यावयाची काळजी प्रात्यक्षिकासह आयोजन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी व शिक्षिका या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या.

**'वाचन प्रेरणा दिन' संपन्न**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस दि. १५ ऑक्टोबर २०१६ 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेचे पूजन लेखक मा. डॉ. अनिल आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. वाचनाचे महत्त्व, साधने याबाबत मोलाची माहिती दिली. उपशिक्षक श्री. भिमराव आडसूळ यांनीही याप्रसंगी थोर महामानवांची उदाहरणे देऊन वाचनाचे महत्त्व विषद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी काय वाचावे, का वाचावे, चिंतन - मनन यांचे महत्त्व आणि स्वतःची पुस्तक ग्रंथ संपदा प्रत्येकाकडे असावी यासाठी बचत करुन, पुस्तक खरेदी करावी असे सुचविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उपशिक्षक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. भागवत शेलार यांनी केले.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मांडलेल्या ग्रंथप्रदर्शनास प्रमुख पाहुण्यांसह मान्यवरांनी भेट दिली. दिवसभर विद्यार्थी - शिक्षक यांनी ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. संस्थेच्या इंदुमती वाचनालयातूनही ग्रंथप्रदर्शनासाठी मासिके व पुस्तके मिळाली होती. ग्रंथपाल चंद्रकांत बागूल यांचा सत्कार डॉ. आठवले यांच्या हस्ते करण्यात आला. ***

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**संचालक : प्रा. राजेंद्र कांबळे** **प्र.प्राचार्य : डॉ. एन. एच. रौंदळ**

मंगळवार दि. १३.९.२०१६ रोजी वणी, नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या खो खो स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संघाने अतिशय सुंदर खेळाचे प्रदर्शन करीत उपांत्य फेरी गाठली.

तसेच खो खो संघातील कु. शर्मिला चौधरी - एस. वाय. बी. ए., कु. वृषाली भोये - एस. वाय. बी. एस्सी यांची विद्यापीठ स्तरावर निवड झाली आहे. या विद्यार्थिनींना महाविद्यालयातील क्रीडा समन्वयक प्रा. प्रशांत बी. वानखेडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच राज्यस्तरीय **सेपकटकरा** या खेळात कु. हर्षद दरगोडे - एस. वाय. बी. कॉम याची निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल संचालक डॉ. निहार वाळिंबे आणि श्री. संजय गुंजाळ तसेच प्राचार्य डॉ. एन. एच. रौंदळ आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी खेळाडू आणि प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले.

**स्पर्धेत यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा!**

***

# विज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**

**प्र. प्राचार्या : सौ. सुरेखा देशमुख**

### आदर्श शिक्षक पुरस्कार

लायन्स शताब्दी महोत्सवी वर्ष - द इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लबज् डिक्ट्रीक्ट ३२३ डी २ दि. ७.९.२०१६ रोजी आयोजित शिक्षक दिन गौरव सोहळा साजरा करण्यात आला. यामध्ये **प्र. प्राचार्या सौ. सुरेखा देशमुख यांना आदर्श शिक्षक पुरस्कार ज्येष्ठ मराठी साहित्यिक मा. श्री. सदानंदजी मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**

### शैक्षणिक सत्र पूर्तता /समाप्ती

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील द्वितीय व तृतीय वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) या विद्याशाखेचा प्रथम सत्राचा अभ्यासक्रम १००% पूर्ण होऊन सत्राची सांगता झाली.

### विद्यापीठ परीक्षा

महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.एस्सी. (संगणकशास्त्र) च्या सत्रांत परीक्षा दि. ४ ऑक्टोबर २०१६ ते दि. २१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीमध्ये सुरळीत पार पडल्या.

### कठीण विषयांचे मार्गदर्शन योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कठीण विषयांचे मार्गदर्शन करण्यात येते. यामध्ये प्रथम वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी दि. ६ ते १३ ऑक्टोबर २०१६ दरम्यान 'प्रोग्रॅम इन सी (सीएस्-१)' या विषयासाठी महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सौ. रेखा जोशी यांचे विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन लाभले.

### अतिथी व्याख्यान

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आरोग्य योजने अंतर्गत प्रथम वर्ष बी. एस्सी. या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्यपर व्याख्यान दि. ४ ऑक्टोबर २०१६ रोजी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ''निरोगी आरोग्य'' विषयक डॉ. पी. के. महाजन यांचे प्रकट व्याख्यान आयोजिले होते त्याचा सर्व विद्यार्थ्यांना लाभ घेतला.

### देणे समाजाचे समाजासाठी (Joy of Giving)

२००९ सालापासून भारतामध्ये असा उपक्रम दरवर्षी साजरा करण्यात येतो. दि. २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या आठवड्यामध्ये हा उपक्रम साजरा केला जातो. यावर्षी महाविद्यालयामध्ये हा उपक्रम साजरा केला. त्या अंतर्गत जमा केलेले शालेय साहित्य 'तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास' मु. पो. वेल्हे या समाजोपयोगी संस्थेला देऊन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी समाजबांधिलकीचे भान जपले. सदर संस्थेने कृतज्ञता म्हणून महाविद्यालयाला कौतुकपत्र प्रदान केले.

### Placement Cell

Placement Activity अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध ITI कंपनीज्ना आमंत्रित करण्यात येते. यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी माहे ऑगस्ट २०१६ मध्ये झालेल्या activities चा तपशील पुढील प्रमाणे:

| कंपनी | पदव्युत्तर अभ्यासक्रम<br>एम. एस्सी. (संगणकशास्त्र)<br>एम. सी. ए. (विज्ञान)<br>निवड झालेल्या<br>विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| Vayas Systems | ०३ |
| Inspire IT Soloutions | ०१ |
| Webmatrix Solutions | ०२ |
| Webtech Developers | ०१ |

तसेच माहे सप्टेंबर २०१६ मध्ये झालेल्या activities चा तपशील पुढील प्रमाणे :

| कंपनी | पदव्युत्तर अभ्यासक्रम - एम. एस्सी (संगणकशास्त्र) एम.सी.ए. (विज्ञान) निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| VSPL | ०३ |
| Inteliment | ०१ |
| AmbagInfo | ०२ |

**क्रीडा स्पर्धेतील यश**

पुणे सिटी झोनल स्पोर्टस् कमिटीतर्फे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये फुटबॉल व क्रिकेट या क्रीडा प्रकारामध्ये महाविद्यालयाला सांघिक यश मिळाले. दि. १७.१०.२०१६ रोजी झालेल्या फुटबॉल क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थी तन्मय शेठ (३,३५ मि.) आणि यशकुमार जाधव (१८,२४ मि.) यांनी प्रत्येकी दोन गोल केले व एच. व्ही. देसाई महाविद्यालयावर ४-२ अशी मात केली. या संबंधी बातमी दै. सकाळ व दै. महाराष्ट्र टाईम्स् या प्रमुख वृत्तपत्रामध्ये छापून आलेली आहे. ✻✻✻

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी**

**अभिनंदनीय**

✻ पुणे जिल्हा परिषदेतर्फे आयोजित स्पर्धांमध्ये शाळेतील कु. कनिष्का ढोले (इ. ९वी ब) या विद्यार्थिनीने खालील स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावली.

| | |
|---|---|
| गोळाफेक व थाळीफेक स्पर्धा | प्रथम क्रमांक |
| हॅमरथ्रो | द्वितीय क्रमांक |

झोनल लेव्हल स्पर्धांमध्ये कु. कनिष्काची निवड झाली आहे.

✻ दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी एस.पी.एम. इंग्लिश स्कूलमध्ये पंचम आंतरशालेय गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत शाळेतील इ. ३री तील कु. आर्या आठल्ये व चि. वर्धन देशपांडे या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेसाठी कवयित्री शांता शेळके यांची गाणी हा विषय देण्यात आला होता.

✻ दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी थोर साहित्यिक कथाकथनकार कै. व. पु. काळे यांच्या स्मरणार्थ आंतरशालेय कथा-कथन स्पर्धा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे बालशिक्षण मंदिर या शाळेत आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी संस्कारक्षम बोधकथा हा विषय देण्यात आला होता. शाळेतील इ. ४थी अ मधील विद्यार्थिनी कु. आर्या देशपांडे हिला तृतीय क्रमांकाचे बक्षीस व कु. भक्ती धर्माधिकारी हिला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. या स्पर्धेत वेगवेगळ्या शाळांतून एकूण ७८ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी शाळेच्या पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी व पर्यवेक्षिका सौ. गीता उद्गीर यांनी प्रोत्साहन दिले.

✻ ऑक्टोबर २०१६ मध्ये वर्ल्ड असोसिएशन ऑफ किक बॉक्सिंग ऑर्गनायझेशनने आयोजित केलेल्या ऑल राऊंडर स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थिनी कु. पूर्वा आंबवले (इ. ९वी अ) हिने ब्राऊन बेल्ट ३, बेस्ट काथा आणि बेस्ट फायटर ही बक्षीसे मिळविली.

**इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा**

दि. २८ सप्टेंबर२०१६ रोजी प्राथमिक विभागातील इ. १ली ते ४थी तील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रत्येक इयत्तेसाठी वेगवेगळे विषय देण्यात आले होते. प्रत्येक इयत्तेसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस विद्यार्थ्यांना देण्यात आले. या स्पर्धेचे

**कृपया पुढील वृत्त पृष्ठ क्र. १५ वर पहावे**

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ-नाशिक

**संचालक : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका - सौ. मनिषा साठे**
**सौ. सोनिया राजवाडे**

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

### संस्कृतीदर्शन

दि. १३ व १५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ''ओळख भारताची - भारतातील विविध पैलू'' हा अभिनव उपक्रम सादर केला. 'ओळख भारताची' या उपक्रमाचे हे पाचवे वर्ष आहे. या उपक्रमासाठी विद्यार्थी व शिक्षकांनी अभ्यास करुन विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण सहाय्यक श्री. दिलीप गोविंद व श्री. शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. अशोक दुधारे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख अतिथी सौ. गोविंद, सौ. दुधारे संस्थेचे सल्लागार प्राचार्य श्री. अ. पाटणकर, संचालक डॉ. निहार वाळिंबे, श्री. अमोल जोशी व श्री. संजय गुंजाळ, माजी मुख्याध्यापिका सौ. रुपाली अकोलकर यांनी कार्यक्रमाचे परिक्षण केले आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी विविध विषय जसे कला, संस्कृती, क्रीडा, अर्थव्यवस्था, इतिहास व विज्ञान या संदर्भातील माहितीचे वर्गवार प्रदर्शन केले. इ. ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण या विषयावरील प्रकल्प सादर केले. हा कार्यक्रम मुख्याध्यापिका सौ. सोनिया राजवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. याप्रसंगी पालकांचा सहभाग मोलाचा ठरला.

## पूर्व प्राथमिक विभाग

दि. ८.९.२०१६ रोजी गणेशोत्सवानिमित्त श्लोक पठण करणे हा उपक्रम ५ दिवस घेण्यात आला. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी गणेशाचे श्लोक व गौरीचे श्लोक यांचे पठण वर्ग - शिक्षकांसमोर केले. पारंपारिक सणाचे महत्त्व आणि त्यांच्या जोपासना करणे या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.

दि. २३.९.२०१६ रोजी पूर्व प्राथमिक विभागात 'जादुचा शब्द' हा आगळा वेगळा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात शिक्षक विद्यार्थ्यांना एक अक्षर देणार त्यातून त्या विद्यार्थ्यांने नवीन शब्द तयार करणे व त्याच शब्दाचे शेवटचे अक्षर घेऊन पुढील विद्यार्थ्याने नवीन शब्द तयार करणे. अशा प्रकारे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार शब्द तयार केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण बाहेर काढणे व त्यांची मानसिक क्षमता ओळखणे हा होय.

दि. २९.९.२०१६ रोजी सिनियर केजीच्या तीनही इयत्तेमध्ये ''Word bank day'' हा उपक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांना एक शब्द देऊन त्याच संबधित आणखी नवीन शब्द विद्यार्थ्याने तयार करणे व शिक्षकांना म्हणून दाखविणे, यात विद्यार्थ्यांचे बौद्धिक कौशल्य व त्यांची विचार क्षमता वाढविणे हा या उपक्रमाचा हेतू आहे.

दि. २.९.२०१६ रोजी शाळेत इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी खालील विषयांवर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. १) Various dance forms of India २) History of India ३) Olympics स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. केतकी परांजपे | इ. ७ वी |
| कु. आयुश सोनार | इ. ६वी |
| कु. मानसी अहिर | इ. ५ वी |

या दिवशी शाळेत पोळा हा सण साजरा करण्यात आला. शिक्षिका स्वाती जाधव यांनी विद्यार्थ्यांना पोळा या सणाची माहिती दिली.

दि. ३.९.२०१६ रोजी शाळेत शिक्षकदिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षिका सौ. गीता तोडी यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक

दिनाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी त्यानिमित्त गाणे सादर केले. सिनियर केजीच्या चि. ऋग्वेद पाठक व समृद्धी जांगडा या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या विषयी भावना गाण्यातून व्यक्त केल्या. त्यानंतर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही शिक्षकांना भेटकार्ड व पुष्प देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

दि. ५ सप्टेंबर २०१६ रोजी शाळेत जागतिक साक्षरता दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. माधुरी गवळी यांनी विद्यार्थ्यांना साक्षरता दिन व शिक्षणाचे महत्त्व याविषयी माहिती दिली.

या दिवशी शाळेत इ. ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शाडूच्या मातीचा गणपती बनविणे ही कार्यशाळा घेण्यात आली. यात सर्व विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेतला. कलाशिक्षिका सौ. सायली पाटील यांनी त्यांना मार्गदर्शन केले. त्यात विद्यार्थ्यांनी गणपतीची घरी प्राणप्रतिष्ठा केली.

दि. ८ सप्टेंबर २०१६ रोजी शाळेत कॅमलीन तर्फे घेण्यात येणारी चित्रकलेची '**रंगबहार**' ही स्पर्धा घेण्यात आली. त्यात इ. १ली ते ७ वी तसेच सिनियर केजीच्या एकूण ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १०,११ व १२ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्य स्पोर्टस एरोबिक फिटनेस ॲड हिपहॉप असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या ११ व्या राज्यस्तरीय स्पर्धा जळगाव येथे घेण्यात आल्या. त्यात आपल्या शाळेतील परफेक्ट जिम्नॅस्टिक क्लबचे खालील विद्यार्थी विजेते झाले. १) चि. जुगल हरेश पोकार - गोल्डमेडल सांघिक इ. ७ वी ब २) चि. कौस्तुभ विजय अहिरे - गोल्ड, सिल्व्हर, ब्रॉझ मेडल, इ. ४ थी ब (सांघिक व वैयक्तिक) ३) कु. तन्वी सचिन अहिरराव - ब्रॉझ मेडल, इ. ३ री अ या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक श्री. विजय साळवे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ११.९.२०१६ रोजी नाशिक जिल्हा कराटे चॅम्पियन तर्फे वर्ल्ड ट्रेडिशनल शोटोकन कराटे फेडरेशन स्पर्धा घेण्यात आली. कु. मेहाली गोसावी इ. ५ वी अ हिला सिल्व्हर पदक मिळाले.

दि. २०.९.२०१६ रोजी डी.एस. ओ. नाशिक आणि 'योगा असोसिएशन', नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या योगा स्पर्धेत चि. जुगल हरेश पोकार इ. ७ वी ब याने जिल्हास्तरीय सहभाग घेतला.

तसेच हिंदी दिवस निमित्त हिंदी स्पर्धा घेण्यात आली. इ. ५ वी ते ७ वी च्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे व प्राथमिक विभागाच्या सौ. प्रतिभा वैद्य यांनी परीक्षक म्हणून काम केले. हिंदी शिक्षिका सौ. विद्या आचारी यांनी सूत्रसंचालन केले.

स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे १) विद्यार्थी और अनुशासन २) व्यायामके लाभ ३) मेक इन इंडिया

यशस्वी विद्यार्थ्यांची नावे १) अभिषेक बोडके - इ. ५ वी ब २) केतकी पवार - इ. ५ वी अ ३) अनुराग तिवारी इ. ६ वी ब

नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना नागपूर यांच्या विद्यमाने राज्य कनिष्ठ गट ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा नागपूर येथे दि. २४ ते २६ सप्टेंबर २०१६ दरम्यान आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत कु. ईश्वरी गरुड - इ. ६ वी ब या विद्यार्थीनीने सहभाग घेतला.

दि. २६.९.२०१६ रोजी शाळेत पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जन्मतिथी साजरी करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे उपस्थित होत्या. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. सोनाली जोशी यांनी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. ***

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**
**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ**

### शिक्षक दिन

दि. ३ सप्टेंबर २०१६ रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. या दिवशी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनीच शाळा सांभाळली, शिक्षक बनून अध्यापनाचे कार्य केले. विद्यार्थ्यांनी कवितेतून, भाषणातून शिक्षकांविषयी आदर व्यक्त केला. इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नाटिका सादर केली. यानंतर शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिकच्या सर्व शिक्षकांनी सहभाग घेऊन बक्षीस प्राप्त केले. मुख्याध्यापिका सौ. कुलश्रेष्ठ यांनी संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांचा सर्व शिक्षकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती म्हात्रे (सेंट झेविअर्स हायस्कूल) यांचा पुष्प देऊन सत्कार केला. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांनी सर्व शिक्षकांना शाळेच्या वतीने श्रीफळ व पेन देऊन शिक्षकदिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सदैव कार्यतत्पर रहावे. आजचा शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मानबिंदू हवा, शिक्षकांचे ज्ञानही अद्यावत हवे, असा मोलाचा संदेश दिला. यानंतर स्पर्धेत विजयी शिक्षकांना संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

बक्षिस प्राप्त शिक्षकांची नावे पुढील प्रमाणे

| नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| श्रीमती नलिनी जाधव | आत-बाहेर | प्रथम |
| श्रीमती रत्ना सिंग | संगीतखुर्ची | द्वितीय |
| श्रीमती रत्ना सिंग | चेंडू फेकणे | तृतीय |
| श्री. जगन्नाथ कोळी | चेंडू फेकणे | प्रथम |
| श्री. रमेश राऊत | चेंडू फेकणे | द्वितीय |
| श्री. सुहास राऊळ | संगीतखुर्ची | तृतीय |
| सौ. प्रिया तिय्यर | संगीतखुर्ची | द्वितीय |
| सौ. प्रिया तिय्यर | तळ्यात मळ्यात | तृतीय |
| सौ. प्रतिभा कुमकर | तळ्यात मळ्यात | द्वितीय |

### विद्यार्थ्यांचे सुयश

✲ आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप २०१६ मुलुंड येथे आयोजित शोतोकान कराटे स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|
| चि. आर्यन तळेकर | ७ वी | सुवर्ण/सुवर्ण |
| कु. सुजल कदम | ७ वी | कांस्य |
| चि. प्रियेश पाटील | ८ वी | सुवर्ण |
| कु. प्रांजल दाभेकर | ५वी | कांस्य |
| चि. प्रज्ज्वल दाभेकर | ८ वी | सुवर्ण/रौप्य |
| चि. देव घिल्डियाल | ७ वी | कांस्य |

**वरील सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

✲ रोटरी क्लब द्वारा आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत कु. सिध्दी अनिल कुंभार ७वी अ हिचा तृतीय क्रमांक आला. तिला प्रशस्तिपत्रक व चषक देऊन गौरव करण्यात आला. **शाळेच्या व संस्थेच्या वतीने तिचे व मार्गदर्शक शिक्षक श्री. रमेश राऊत यांचे हार्दिक अभिनंदन!**

**पूर्व प्राथमिक व प्राथमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक**

### ब्रह्मविद्या साधक संघ आयोजित व्याख्यान

दि. २० ऑगस्ट २०१६ रोजी या दिवशी ब्रह्मविद्या साधक संघ यांच्या तर्फे विद्याभवन शाळा नेरुळ येथे

पालकांसाठी व शिक्षकांसाठी योग साधनेचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळिक तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व ब्रह्मविद्या साधक संघातर्फे आलेले प्रतिनिधी श्री. बापट उपस्थित होते. श्री. बापट यांनी पालकांना व शिक्षकांना ब्रह्मविद्येच्या पायाभूत वर्गाविषयी माहिती दिली. हे वर्ग कोठे, कधी व किती दिवसांचे आहेत हे सांगितले. त्याशिवाय त्यांनी श्वसन व विचार करण्याचे आठ प्रकार सांगितले.

### हिंदी दिवस

दि. १४ सप्टेंबर २०१६ रोजी विद्याभवन सभागृहात हिंदी दिवस दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळिक यांच्या उपस्थितीत पार पडला. सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी हिंदी दिवस साजरा करण्यामागचा हेतू सांगून मुलांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सौ. पौर्णिमा खरजे (सह. शिक्षिका माध्य. इंग्रजी) यांनी हिंदी भाषेचे दु:ख आपल्या कवितेतून व्यक्त केले. तसेच सौ. ममता राक्षे (सह शिक्षिका प्राथ. इंग्रजी) यांनी हिंदी ही जगात सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेपैकी एक असूनही तिला नवयुवकांकडून हवी तेवढी प्रतिष्ठा मिळत नाही, ही खंत आपल्या भाषणांतून व्यक्त केली. प्राथमिक व माध्यमिक इंग्रजीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेविषयीचे प्रेम आपल्या कवितेतून व भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रिया तिय्यर यांनी केले व श्री. संकेत थळे यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाचा समारोप केला. संपूर्ण दिवसभर विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेतूनच एकमेकांशी संवाद साधला.

### ज्येष्ठ नागरिक दिन

दि. १ ऑक्टोबर २०१६ रोजी पूर्व प्राथमिक इंग्रजी व मराठी माध्यमाचा ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संचालक श्री. दिनेश मिसाळ, अतिथी म्हणून आपल्याच संस्थेचे माजी विद्यार्थी सेवानिवृत्त पोलिस उपायुक्त श्री. शिवाजीराव पाटील उपस्थित होते. तसेच पूर्व प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या आजी आजोबांना आमंत्रित करण्यात आले होते. ते ही मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमास उपस्थित होते. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी पुष्पगुच्छ, शुभेच्छा पत्र व भेटवस्तु देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. आजी आजोबांनाही शुभेच्छा पत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. आजी आजोबांसाठी विविध खेळ घेण्यात आले. संगीत खुर्ची, बादलीत चेंडू टाकणे, मडके फोडणे. आजी आजोबांनी खेळात सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला. विजेत्या आजी आजोबांना अतिथी श्री. पाटील यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. श्री. शिवाजीराव पाटील यांनी आजी आजोबांना आपल्या फावल्या वेळेचा लहान मुलांबरोबर खेळून व समाजसेवा करुन सदुपयोग करा, तसेच परमेश्वराच्या नामस्मरणात रहा. सत्कर्म करा, असे मोलाचे मार्गदर्शन केले. आजी आजोबांना चहापान देऊन आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्राथमिक मराठी
## मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ

### कंपास पेट्या वाटप कार्यक्रम

दि. ३०.८.२०१६ रोजी मनसे तर्फे मोफत कंपास वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी नवी मुंबई महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष श्री. गजानन काळे, संचालक डॉ. शं. पा. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. श्री. गजानन काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी इयत्ता १ली ते ४थी च्या वर्गातील २५ गरीब व हुशार विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक कंपास पेटीचे वाटप केले. पुढील वर्षीसुध्दा शक्य तेवढ्या जास्त विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्याचा मनोदय श्री. गजानन काळे यांनी व्यक्त केला. **त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक आभार**.

## बालसभा

दि. २९ ऑगस्ट २०१६ रोजी बालसभेचे आयोजन केले होते. बालसभेचे अध्यक्षस्थान कु. अविष्का गणेश महाकाळ (इ. ७वी) या विद्यार्थिनीने भूषविले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का गणेश महाकाळ व कु. श्रुतिका गोरखनाथ पाटील या विद्यार्थिनींनी केले. विद्यार्थ्यांनी संगीत, कविता गायन, नृत्य असे अनेक कार्यक्रम सादर केले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून बालसभा संपन्न झाली.

## गोपाळकाला

दि. २५ ऑगस्ट २०१६ रोजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक मराठी विभागाने दहीहंडी उत्सव आनंदाने व उत्साहाने साजरा केला. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांच्या शुभहस्ते बाळकृष्ण प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षकवृंदाने कृष्णपाळणा गीत गायले. पूर्व प्राथमिक मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कृष्णलीला सादर केल्या. अनेक गाण्यांवर बालचमूंनी बहारदार नृत्ये केली. गोविंद आला रे आला असे म्हणत नृत्यांचा आनंद लुटला. नाचत-गात विद्यार्थ्यांनी एकावर एक मनोरे रचले व दहीहंडी फोडण्याचा मनसोक्त आनंद घेतला. सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचा काला वाटण्यात आला.

## शिक्षकदिन

ज्ञानाचा सूर्य प्रेमाचा महासागर आणि दया, क्षमा, शांती याचा हिमालय म्हणजे गुरु. गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे शिक्षकदिन, प्राथमिक मराठी विभागाने मोठ्या आनंदात व उत्साहात हा दिवस साजरा केला. शिक्षकदिनानिमित्त संचालक डॉ. शं. पां, किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापिका, सौ. राजकुमारी इंदलकर उपस्थित होत्या. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी शिक्षक कसा आदर्श असावा हे सांगितले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे थोर तत्वज्ञ विचारवंत होते. साधी राहणी उच्च विचारसरणी असे त्यांचे जीवन होते. आजचा शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मानबिंदू ठरायला हवा. शिक्षकांचे ज्ञानही अद्ययावत् हवे असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनीही सर्व शिक्षकांना शिक्षकदिनाच्या शुभेच्छा दिल्या त्यानंतर श्रीफळ व पेन देऊन शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शिक्षकदिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमध्ये सर्वच शिक्षकांनी आनंदाने सहभाग घेऊन स्पर्धांचा आनंद लुटला व अनेक बक्षीसे पटकाविली. या दिवशी काही विद्यार्थ्यांनीच शाळा सांभाळली. इ ७ वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अध्यापनाचे कार्य केले.

**पूर्व प्राथमिक मराठी**
**मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ**

## ऑरेंज डे

पूर्व प्राथमिक मराठी विभाग दि. २/९/२०१६ रोजी ऑरेंज डे साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी केशरी रंगाचे कपडे घातले होते. याच दिवशी शाळेसमोरील गणेशोत्सव मंडळात आमच्या बालचमुंनी गणेशाचे दर्शन घेतले. श्री गणेशासमोर सर्व बालकांनी श्री गणपती स्तोत्राचे पठण केले. गणपती बाप्पा मोरय्या मंगलमूर्ती मोरया असे म्हणत सर्व मुलांनी बाप्पाचा जयजयकार केला.

## मोफत वह्या वाटप कार्यक्रम

दि. २९ जुलै २०१६ रोजी विद्याभवन नेरुळ येथील शाळेमध्ये मोफत शैक्षणिक साहित्य (वह्या, पेन) वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. ल. दि. कुलकर्णी यांचे कुटुंबीय, त्यांचा मुलगा श्री. अवधूत कुलकर्णी, स्नुषा सौ. अनामिका कुलकर्णी, जावई श्री. शिरीष वाळिंबे व मुलगी सौ संध्या वाळिंबे, संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, श्री. दिनेश मिसाळ व चारही विभागाच्या मुख्याध्यापिका आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संचालक

डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर प्राथमिक मराठी विभागाच्या २९ व इंग्रजी विभागाच्या ३१ अशा एकूण ६० गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथी व संचालक यांच्या शुभहस्ते शैक्षणिक साहित्याचे (वह्या, पेन) वाटप करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथी सौ. संध्या वाळिंबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, प्रत्येक वर्षी आमचे वडील श्री. ल. दि. कुलकर्णी हे स्वत: किंवा समाजातील इतर व्यक्तींच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात. या वर्षी सुध्दा आमचे वडील श्री. ल. दि. कुलकर्णी यांनी स्वत: व डोंबिवलीतील ज्येष्ठ समाज सेवक श्री. वासुदेव महादेव हंचाटे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप केले आहे, आणि येथून पुढेही ते करणार आहेत. आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांची सेवा करण्याची संधी शाळेने दिली. त्याबद्दल शाळेचे व संस्थेचे आभार मानले. तसेच शाळा परिसर पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री. पुजारी व आभार सौ. राधिका भोसले यांनी मानले. ***

**मुक्तांगण इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालय,**
**वृत्त पृष्ठ क्र. ९ वरुन पुढे**

आयोजन प्राथमिक विभागातील शिक्षिका सौ. संज्योत दामले यांनी केले.

### जर्मन निबंध स्पर्धा

दि. २३ सप्टेंबर २०१६ रोजी माध्यमिक विभागातील इ. ८वी ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठी जर्मन निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कु. रुतिका ओसवाल | इ.१०वी ब | प्रथम |
| कु. वैष्णवी शिंदे | इ. ९वी ब | द्वितीय |
| कु. वैष्णवी तपस्वी | इ. ८वी ड | तृतीय |

### संस्कृत वक्तृत्व स्पर्धा

दि. २७ सप्टेंबर २०१६ रोजी माध्यमिक विभागातील इ. ८वी ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठी संस्कृत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कु. प्रांजली गडकरी | इ.८वी अ | प्रथम |
| कु. रचना पाटील | इ. १०वी अ | द्वितीय |
| चि. प्रतीक डबीर | इ. ९वी इ | तृतीय |

### चित्रकला स्पर्धा

दि.२९ सप्टेंबर २०१६ रोजी पूर्व-प्राथमिक विभागातील ज्युनियर के. जी. तील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या चित्रामध्ये आपल्या मनाप्रमाणे रंग भरले. काही विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर रंगसंगती केली होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राथमिक विभागातील शिक्षिका सौ. कल्याणी कुलकर्णी व सौ. कीर्ती देव यांनी काम पाहिले.

### स्वच्छता फेरी अभियान

दि. १४ ऑक्टोबर २०१६ रोजी प्राथमिक विभागातील इयत्ता ४थी तील विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात स्वच्छता फेरी काढली. यावेळी वेगवेगळी घोषवाक्ये फलकावर लिहून स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे या हेतूने सादर करण्यात आले. यावेळी शाळेच्या पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी व पर्यवेक्षिका सौ. गीता उद्‌गीर याही उपस्थित होत्या.

### वाचन-प्रेरणा दिन

दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी शाळेत वाचन-प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी इ. ३री व ४थी तील विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पुस्तके वाचून वाचन प्रेरणा दिवस साजरा केला. पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी यांनीही विद्यार्थ्यांसमवेत वाचन केले. ***

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : प्राचार्य के. एन. शिरकांडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

**विद्याभवन नं. २ - माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. उमा गोपालकृष्णन्**

### गीत गायन स्पर्धा

प्रशालेत गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

**५वी - ६ वी गट**

| क्रमांक | गट | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. वेनारगे स्वरा विकास | ५ वी |
| द्वितीय | कु. देसाई भूमी कमलाकर | ५ वी |
| तृतीय | चि. ताटकर हर्षल सुनिल | ५ वी |
| तृतीय | चि. राणे वेदांत प्रदिप | ६ वी |

**७ वी - ८वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. राणे सिद्धेश विनय | ७ वी |
| द्वितीय | चि. सामंत शुभम शाम | ८ वी |
| तृतीय | चि. तावडे शर्वरी संदिप | ७ वी |

**९ वी - १० वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. चौधरी वैष्णवी सुनिल | १० वी |
| द्वितीय | कु. पिंगट विशाखा ज्ञानेश्वर | ९ वी |
| तृतीय | कु. वाल्मिकी रीतिका आनंद | १० वी |
| तृतीय | कु. गव्हाणे वैष्णवी बाळासाहेब | ९ वी |

### शालेय वक्तृत्व स्पर्धा

अप्पासाहेब गरगटे सभागृहात इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत खालील विद्यार्थी विजयी झाले.

**५वी - ६वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. ताटकर हर्षल सुनिल | ५वी |
| द्वितीय | कु. मोहिते कल्याणी समीर | ५वी |
| तृतीय | चि. लंके कृष्णा अरुण | ५वी |
| उत्तेजनार्थ | कु. मनस्वी आशिष दळवी | ६वी |

**७ वी - ८वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. गोळे आर्या मनोज | ८ वी |
| द्वितीय | चि. गन्मुखी जय गंगाधर | ७ वी |
| तृतीय | चि. गायकवाड जय गंगाधर | ७ वी |
| उत्तेजनार्थ | चि. दुखंडे लतिका प्रकाश | ८वी |
| उत्तेजनार्थ | चि. निमकर सई निखिल | ७वी |

**९ वी - १० वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. वाणी दुहिता सुनिल | १०वी |
| द्वितीय | चि. फदाले कपिल संजय | १०वी |
| तृतीय | कु. कोठावदे हर्षा प्रकाश | ९वी |
| उत्तेजनार्थ | चि. बागवे ऋग्वेद राजन | १०वी |
| उत्तेजनार्थ | चि. आपटे चैतन्य प्रसाद | १०वी |

**माध्यमिक मराठी**
**मुख्याध्यापिका -**

**८वी - १० वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. गरुड अंकिता रविंद्र | १०वी |
| द्वितीय | कु. नाईकवडी विद्या शिवाजी | ९वी |
| तृतीय | कु. येवले प्रणाली भाऊसाहेब | ८वी |

### कथाकथन स्पर्धा

अप्पासाहेब गरगटे सभागृहात दरवर्षीप्रमाणे इंग्रजी माध्यम इ ५वी ते ६वी च्या विद्यार्थ्यांसाठी कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. स्पर्धेतील बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे.

| क्रमांक | गट | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. दळवी मनस्वी आशिष | ६वी |
| द्वितीय | चि. लंके कृष्णा अरुण | ५वी |
| | कु. देसाई भूमी कमलाकर | ५वी |
| तृतीय | चि. ताटकर हर्षल सुनील | ५वी |
| उत्तेजनार्थ | चि. हांडे स्वयंम रविंद्र | ५वी |

### भगवद्‌गीता वक्तृत्व स्पर्धा

माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय गीता वक्तृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षीसे पटकाविली.

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. सावंत सृष्टी संजय | ७ वी |
| तृतीय | चि. कोंडुस्कर सिध्दांत रमेश | ९ वी |

### भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धा

मुंबई विभागातर्फे घेण्यात आलेल्या भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षीसे पटकाविली.

### मराठीत भगवद्‌गीता पाठांतर

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. दीक्षित वेदांत पराग | ५वी |

### संस्कृत भगवद्‌गीता पाठांतर


| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. ताटकर हर्षल सुनिल | ५वी |
| द्वितीय | चि. देसाई भूमी कमलाकर | ५वी |
| तृतीय | चि. देवगिरीकर स्वराज | ५वी |

### टॅलेन्ट कॉन्टेस्ट (NIE)

**टाईम्स (NIE) यांनी दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी दादर येथे टॅलेन्ट कॉन्टेस्ट आयोजित केली होती. यात इयत्ता दहावीच्या कु. दुहिता सुनिल वाणी व चि. कुलकर्णी गौरव सुधीर यांनी विभागीय स्तरावर ९९.१०% गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त केला. करिअर लाँचर तर्फे त्यांना रु. १,७२,५००/- ची फ्री स्कॉलरशिप दोन वर्षाच्या कोर्ससाठी मान्य करण्यात आली. त्यांच्या या भरघोस यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !**



कु. दुहिता सु. वाणी



चि. गौरव कुलकर्णी

### IPM स्पर्धा

दि. १४ सप्टेंबर २०१६ रोजी St. Antony High School चेंबूर येथे आय.पी.एम. या गणित परीक्षेची मेगा फाईनल आयोजित केली होती. या स्पर्धेत कु. दुहिता सुनिल वाणी १० वी अ हिने राष्ट्रीय स्तरावर २० वा क्रमांक प्राप्त केला. तसेच तिला रु. ५००/- ची स्कॉलरशिपही देण्यात आली.

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## मुख्याध्यापिका सौ. योगिनी राजेंद्र पोतदार

### मेहंदी स्पर्धा

दि. २३.९.२०१६ रोजी निसर्ग मंडळ योजनेअंतर्गत इ. ७ वी - ८वी गटातील विद्यार्थिनींसाठी मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ३८ स्पर्धकांनी भाग घेतला. विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर मेहंदी काढून सर्वांची वाहवा मिळवली. या स्पर्धेचे परीक्षण श्रीमती जया सुतार व श्रीमती पूजा पाटील यांनी केले. यशस्वी विद्यार्थिनी खालीलप्रमाणे

| इ. ८वी | क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| | प्रथम | कु. उमाप श्रध्दा कृष्णा |
| | द्वितीय | कु. मुळुक प्रियंका धनंजय |
| | तृतीय | कु. कडव भूमिका विजय |
| | उत्तेजनार्थ | कु. भोसले प्राची प्रकाश |
| | | कु. घागरे सिद्धी बाळकृष्ण |

### सायकल रॅली

प्रदूषण टाळा पर्यावरण वाचवा हा संदेश देण्यासाठी निसर्ग मंडळांतर्गत सायकल रॅली आयोजित करण्यात आली. प्रदूषण विरहित पर्यावरण ही संकल्पना डोळ्यासमोर ठेऊन इ. ७वी-८वी च्या विद्यार्थ्यांनी ही रॅली काढली.

### गणपतीची मूर्ती रंगविणे स्पर्धा

दि. ९.१०.२०१६ रोजी श्री गणेशाची मुर्ती रंगविणे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ५वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला. या स्पर्धेचे आयोजन कलाशिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**तायक्वांदो स्पर्धेतील उज्वल यश**

दि. ४ ऑक्टोबर २०१६ रोजी हैद्राबाद, तेलंगणा येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील तायक्वांदो स्पर्धेत प्रशालेतील माध्यमिक मराठी विभागाचा विद्यार्थी **चि. मयुरेश महेंद्र मटाले, इ. ६वी ब याने महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करुन २१ ते २४ कि. ग्रॅम वजनी गटात राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक पटकाविले. संस्थेतर्फे त्याचे हार्दिक अभिनंदन !**



मयुरेश मटाले

**सहशालेय उपक्रम - निकाल**

दि. १९ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०१६ या कालावधीत एन वॉर्ड स्तरीय सहशालेय उपक्रम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा निकाल खालीलप्रमाणे

**वक्तृत्व स्पर्धा**

| गट | क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| मोठा | तृतीय | कु. साक्षी सांगळे | ९वी |
| | द्वितीय | कु. ऐश्वर्या सुर्यवंशी | कनिष्ठ महा. |

**लोकनृत्य स्पर्धा**

मोठा गट द्वितीय

**समूहगीत स्पर्धा**

लहान गट तृतीय

**लेझीमस्पर्धा**

लहान गट तृतीय

**युवक प्रतिष्ठान - खासदार किरीट सोमैय्या पुरस्कृत शिक्षक सन्मान द्रोणाचार्य पुरस्कार**

दि. २२.९.२०१६ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका **सौ. विजया गणेश तसेच पर्यवेक्षिका सौ. सुरेखा लऊळकर यांना युवक प्रतिष्ठान - खासदार किरीट सोमैया पुरस्कृत गुरु द्रोणाचार्य पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.**

**वाचन प्रेरणा दिन**

थोर अणुवैज्ञानिक, विश्वविख्यात शास्त्रज्ञ, भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात शनिवार दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. प्रशालेच्या एकूण ६०० विद्यार्थ्यांनी वाचू आनंदे सोहळ्यात विविध विषयावरील तसेच डॉ. अब्दुल कलाम यांचे लेखन साहित्य वाचले. वाचन आणि वाचनाचे महत्व या विषयावरील घोषवाक्ये लिहिली.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, म्हणून वाचनानंतर करायच्या विविध उपक्रमांच्या संकल्पना सुचवल्या, मार्गदर्शन केले.

ग्रंथपाल श्रीमती स्वाती राव यांनी प्रशालेच्या सभागृहात ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन भरवले. अशाप्रकारे वाचन प्रेरणा दिन उत्स्फूर्त वाचनाच्या आनंदात उत्साहात पार पडला.

**करीअर मार्गदर्शन**

सोमवार दि. १०.१०.२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता इ. ११ वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर गाईडन्स सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक श्री. जयवंत मुरलीधर कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रभावीपणे मार्गदर्शन केले.

इ. १२ वी नंतर विद्यार्थ्यांसाठी असंख्य कोसेर्स उपलब्ध आहेत याची माहिती वेबसाईटसह विद्यार्थ्यांना श्री. कुलकर्णी यांनी उपलब्ध करुन दिली.

सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसहित सर्व अध्यापक वर्ग उपस्थित होता. आभार प्रदर्शनाचे काम श्री. पाटील एन. व्ही. यांनी केले. ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर - मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष - श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे** **सहाय्यक - श्री. दिनेश पि. मिसाळ**

**दि. १२.८.२०१६ ते २.१०.२०१६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**श्री. वसंत उखर्डू सोनार, घाटकोपर**
**देणगी रु. ८०,०००/-**
श्री. वसंत उखर्डू सोनार यांनी दि. ३१.८.२०१६ रोजी रु. ८०,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. भीमदेव भाऊसाहेब भालेराव, घाटकोपर**
**देणगी रु. २५,०००/-**
श्री. भीमदेव भाऊसाहेब भालेराव यांनी दि. २६.८.२०१६ रोजी रु. २५,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. अशोक गणेश वंडेकर, घाटकोपर,**
**देणगी रु. २२,०००/-**
श्री. अशोक गणेश वंडेकर यांनी दि. २३.८.२०१६ रोजी रु. २२,०००/- देणगी दिलेली.

**श्री. विजय भा. सावंत, अंधेरी,**
**देणगी रु. २०,०००/-**
श्री. विजय भा. सावंत यांनी दि. १९.८.२०१६ रोजी रु. २०,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्रीमती भारती जी. गोरे, भांडूप**
**देणगी रु. २०,०००/-**
श्रीमती भारती जी. गोरे यांनी दि. १९.८.२०१६ रोजी रु. २०,०००/- देणगी दिलेली.

**सौ. जयश्री सुयोग जाधव, घाटकोपर,**
**देणगी रु. ११,०००/-**
सौ. जयश्री सुयोग जाधव यांनी दि. २३.८.२०१६ रोजी रु. ११,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. अमोल हिरोजी भोर, घाटकोपर**
**देणगी रु. ११,०००/-**
श्री. अमोल हिरोजी भोर यांनी दि. २३.८.२०१६ रोजी रु. ११,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. योगेश ब्रम्हानंद पाताडे, घाटकोपर,**
**देणगी रु. १०,०००/-**
श्री. योगेशे ब्रम्हानंद पाताडे यांनी दि. २७.८.२०१६ रोजी रु. १०,०००/- देणगी दिलेली आहे.

**यशश्री लर्निंग सेंटर, घाटकोपर (पूर्व),**
**देणगी रु. ८,०००/-**
यशश्री लर्निंग सेंटर यांनी दि. ९.९.२०१६ रोजी रु. ८,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. संतोष जगन्नाथ सावंत, घाटकोपर**
**देणगी रु. १८,०००/-**
श्री. संतोष जगन्नाथ सावंत यांनी दि. १९ व २३ ऑगस्ट २०१६ रोजी एकूण रु. १८,०००/- ची देणगी दिलेली आहे.

**श्री. अशोक विठ्ठल ताकवले, पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**
श्री. अशोक विठ्ठल ताकवले यांनी दि. ९.८.२०१६ रोजी रु. ५,०००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. महालिंगम विश्वनाथ, माटुंगा**
**देणगी रु. ४,०००/-**
श्री. महालिंगम विश्वनाथ यांनी दि. ९.९.२०१६ रोजी रु. ४,०००/- ची देणगी दिलेली आहे.

**श्री. सुशांत रविंद्र गाडे, घाटकोपर (प),**
**देणगी रु. १,०००/-**
श्री. सुशांत रविंद्र गाडे यांनी दि. १७.९.२०१६ रोजी

रु १,०००/- देणगी दिलेली आहे.

**खालील सर्व देणग्या मुंबई शाखा वाढीसाठी देण्यात आलेल्या आहेत.**


प्रभाकर श्रीधर ठाकूर

**श्रीमती सीमा ठाकूर, चेंबूर**
**देणगी रु. १०,०००/-**

श्रीमती सीमा ठाकूर यांनी दि. २९.८.२०१६ रोजी रु. १०,०००/- ची देणगी कै. प्रभाकर श्रीधर ठाकूर यांच्या स्मरणार्थ दिलेली आहे.

**श्रीमती मीनल जगन्नाथ भोळे, घाटकोपर,**
**देणगी रु. २,५००/-**


श्रीमती मीनल भोळे

श्रीमती मीनल जगन्नाथ भोळे (सहाय्यक शिक्षिका) यांनी दि.१४.९.२०१६ रोजी रु. २,५००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. मिलिंद मधुकर दातार, ठाणे**
**देणगी रु. २,०००/-**

श्री. मिलिंद मधुकर दातार यांनी संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. म. अ. जोशी यांच्या मार्फत दि. २.१०.२०१६ रोजी रु. २,०००/- ची देणगी मुंबई शाखावाढीसाठी दिलेली आहे.

**श्री. उमेश पंडीत जोशी, घाटकोपर**
**देणगी रु. १,००१/-**

श्री. उमेश पंडीत जोशी यांनी दि. १७.९.२०१६ रोजी रु. १,००१/- देणगी दिलेली आहे.

**श्री. सुरेश ज्ञानू आवळे, घाटकोपर**
**देणगी रु. ५००/-**

श्री. सुरेश ज्ञानू आवळे यांनी दि. २६.९.२०१६ रोजी रु. ५००/- देणगी दिलेली आहे.

**श्री. बलराज राजनर्सू पारीपेल्ली, कुर्ला**
**देणगी रु. ५००/-**


श्री. बलराज राजनर्सू पारीपेल्ली यांनी दि. १९.८.२०१६ रोजी रु. ५००/- देणगी दिलेली आहे.

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

श्री. पांडुरंग वामन ताजणे, घाटकोपर, रु. ३०१/-,
श्री. ज्योतिराम खाशाबा बोरगे, घाटकोपर, रु. ३००/-,
प्रो. डॉ. एच. टी. देव, घाटकोपर, रु ३००/-,
सौ. सुचिता सदानंद साळुंखे, ठाणे, रु. २१२/-,
श्री. अजित शिवाजी कदम, चेंबूर, रु. २०१/-,
श्री. प्रशांत माधवराव कुलकर्णी, विक्रोळी, रु. १०१/-,
श्री. दत्ताराम नामदेव सातव, घाटकोपर, रु. १०१/-,
श्री. रमेश पांडुरंग महाबळे, घाटकोपर, रु. १०१/-,
श्री. महेश छोटीराम घुगे, घाटकोपर रु. १,०१०/-

***

**निधन वार्ता**


गोटन नागो बागुल

* महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामधील सेवक श्री. नरेंद्र गोटन बागुल यांचे वडिल श्री. गोटन नागो बागुल यांचे दि. २८.९.२०१६ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले.

* शतायुभवन मधील सेविका श्रीमती सुलोचना वाघचौरे यांचे दि. ७.१०.२०१६ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

***

# ❊ विद्याप्रशाला हायस्कूल व ज्यु. कॉलेज, तळेगांव (अं) नाशिक ❊



गणेशोत्सवानिमित्त वेशभूषा स्पर्धेमध्ये भाग घेतलेले विद्यार्थी,
सोबत प्राचार्या सौ. शैलजा पाटील, उपमुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे, पर्यवेक्षक श्री. ढेरगे



गणेशोत्सवानिमित्त
गायनाचा कार्यक्रम सादर करताना
सौ. प्रिती कोठारकर, सोबत प्राचार्या
सौ. शैलजा पाटील,
उपमुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे,
पर्यवेक्षक श्री. ढेरगे,
शिक्षक प्रतिनिधी श्री. शिवदे

श्री. दिनेश मिसाळ यांचेतर्फे
कै. पितांबर बापू मिसाळ
यांच्या स्मरणार्थ
दिला जाणारा
आदर्श शिक्षक पुरस्कार
संचालक श्री. अमोल जोशी
यांच्या हस्ते स्वीकारताना
उपशिक्षक
श्री. केशव अचुत पाटील
समवेत उपमुख्याध्यापक
श्री. अशोक ढिवरे



# ✲ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✲



विद्यार्थ्यांना वह्या वाटप करताना
सौ. संध्या वाळिंबे, समवेत उजवीकडून
मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. उषा वामने



गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. ल. दि. कुलकर्णी यांचे कुटूंबीय, शाळेचे संचालक व मुख्याध्यापिका



निसर्गपूजेसाठी बसलेले प्रमुख अतिथी सौ. व श्री. वामने आणि सौ. व श्री. कुलकर्णी

# ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻



विद्यार्थ्यांना कंपास वाटपावेळी प्रमुख अतिथी श्री. गजानन काळे, (मनसे शहराध्यक्ष, नवी मुंबई) यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना संचालक डॉ.शं.पां.किंजवडेकर



आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत यशप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेचे संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व कराटे प्रशिक्षिका श्रीमती सुवर्णा तळेकर



आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत यशप्राप्त कु. सिध्दी कुंभारचे अभिनंदन करताना संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ

## ⁕ महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय ⁕



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री - संयुक्त जयंती कार्यक्रम प्रसंगी प्रतिमा पूजनानंतर थोरांचे विचार वाचताना विद्यार्थी चि. प्रशांत खोसे, समवेत प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे, उपशिक्षक श्री. विष्णूदास गावडे आणि विद्यार्थीवर्ग

दि. १५.१०.२०१६ रोजी 'वाचन - प्रेरणा दिन' भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुलकलाम यांच्या प्रतिमेचे पूजन - सोबत लेखक डॉ. अनिल आठवले, प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे, पर्यवेक्षक श्री. भागवत शेलार, शिक्षक व शिक्षकेतर सेवक





दि. १५.१०.२०१६ रोजी 'वाचन - प्रेरणा दिन' विद्यार्थी ग्रंथ प्रदर्शन बघताना

## ❋ महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय ❋



दि. ६.१०.२०१६
'वाहतूक जनजागृती दिन'
विद्यालयातील एन. सी. सी. च्या विद्यार्थांसमवेत
प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे,
वाहतूक पोलीस,
ज्येष्ठ शिक्षक श्री. मल्लीनाथ वाघमोडे
आणि शिक्षिका



बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज व अमतृवेलतर्फे 'आर्थिक साक्षरता' या विषयावर बोलताना अमृतवेलचे संपादक श्री. धर्मेंद्र पवार, सोबत प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे, प्रा. राजश्री कसबे आणि विद्यार्थी



महाराष्ट्र विद्यालयातील सेवक श्री. संदिप रंदवे यांना शिक्षक दिनानिमित्त पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे 'जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार' प्रदान करताना माध्यमिक शिक्षणाधिकारी मा. हरुण आतार, सोबत महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ अध्यक्ष मा. गंगाधर म्हमाणे, पोलीस उपायुक्त भानूप्रताप गर्गे,
श्रमिक कामगार संघटना अध्यक्ष श्री. बाळासाहेब गवळी, आदि

## ✲ विज्ञान महाविद्यालय, पुणे ✲




↑ पुणे सिटी झोनल स्पोर्टस् कमिटी तर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेला संघ



← पुणे सिटी झोनल स्पोर्टस् कमिटी तर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत सहभागी झालेला संघ

## ✲ आश्रम वसतिगृह, पुणे ✲



दि. ११.९.२०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये मार्गदर्शन करताना ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, समवेत प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी व व्यवस्थापक श्री. चंद्रहास बहिरट

## ⁕ कुलगुरु कै. वि. ग. तथा दादासाहेब केतकर ६६ वा स्मृतिदिन क्षणचित्रे ⁕




मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले, 'वृत्तपत्रांची सामाजिक बांधीलकी' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना समवेत डावीकडून कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी




कुलगुरु कै. दादांचे नातू रिटा. ग्रुप कॅप्टन राजीव केतकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले




कार्यक्रमाच्या सूत्रसंचालिका सौ. सायली बापट यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मा. श्री. मल्हार वामन अरणकल्ले

**Postal Reg. No. PCW/168/2014-16 [Publication Date 13th of Every month.
Posting Date 15th of Every month at Marketyard PSO, Pune 411037.]
SAMACHAR - RNI No. 14546/1957. Decl. No. SDO/PUNE/SR/4/2016
License to Post without prepayment of Postage License No. WPP - 56**

**Regd. Newspaper**




कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या ६६ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करताना संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, श्री. मल्हार वामन अरणकल्ले संचालक प्राचार्य हणमंत भोसले आणि कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

**♦ पुणे विद्यार्थी गृह ♦**

▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. रामचंद्र लक्ष्मण शेटे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. रामचंद्र लक्ष्मण शेटे